International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr- 2022

# ब्रम्ह संप्रदाय–एक अभ्यास

**डॉ. संदिप गोविंदराव लोंढे**
इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.
इमेल-londhesandeep2@gmail.com

## प्रस्तावना

विचार ही समाज जीवनातील एक अत्यंत प्रभावी शक्ती आहे. या शक्तीचा समाजातील विविध वर्ग आपआपल्या उद्देशांसाठी वापर करीत असतात. मग त्यातील काही समाजाच्या विकासासाठी, उन्नतीसाठी तर काही सूडबुध्दीने स्वार्थासाठी वापरतात. त्यासाठी ते विशिष्ट समाजाच्या, धर्माच्या, संस्कृतीच्या मुळाशी जाऊन त्यातील तत्वांचा उपयोग आपल्याला हवा तसा लावून आपला स्वार्थ साध्य करतात. आज हिंदू, इस्लाम, शीख, ख्रिश्चन या सर्व धर्मांचा, त्यांच्या तत्वज्ञानाचा दुरुपयोग याच हेतूने प्रचंड प्रमाणावर केला जात आहे. जगातील इतर सर्व धर्मांतील तत्वांप्रमाणे भारतीय धर्म तत्वज्ञानाचा उपयोगही त्या पध्दतीने केला गेला व त्या परंपरेला विकृत स्वरुप दिले गेले. त्यामुळे समाजाचे मानसिक आरोग्य बिघडते व जे तत्वज्ञान समाजाच्या उन्नतीचे असते त्यालाच वाईट ठरवून जे विघातक हानिकारक आहे, त्याचा प्रचंड मोठ्या प्रमाणात गवगवा केला जातो. कधीकधी एकच तत्वज्ञान किंवा या तत्वज्ञानाची निरनिराळी अंगे इतिहासात उद्दिष्टांसाठी वापरली जातात. यासर्व बाबींना आळा घालायचा असेल तर त्या-त्या समाजाचे तत्वज्ञान सामान्य जनांपर्यंत जसेच्या तसे, त्यांच्या भाषेत त्यांच्यापर्यंत पोहचविणे गरजेचे असते व ते काम तत्वत्तेने करीत असतात.

मध्वाचार्यांनी (1199-1287) प्रवर्तित केलेला भक्तिमार्गी वैष्णव संप्रदाय हा भक्तिमार्ग विष्णुने ब्रम्हाला सांगितला व त्याने वायूच्या साह्याने त्याचा प्रचार केला अशी कथा असल्यामुळे या संप्रदायाला 'ब्रम्ह संप्रदाय' असेही म्हणतात. शंकराचार्यांनी प्रतिपा दिलेल्या मायावादाचे व अद्वैताचे खंडण करुन मध्वाचार्यांनी द्वैतमताचा पुरस्कार केला असल्यामुळे हा संप्रदाय द्वैती आहे.[1] स्वतंत्र व अस्वतंत्र अशी दोन तत्वे असून निर्दोष व सर्वगुणसंपन्न असा भगवान विष्णु हे त्यापैकी स्वतंत्र तत्व असल्याचे मानल्यामुळे या द्वैतमताला, स्वतंत्रास्वतंत्रवाद असेही म्हणतात. जीवेश्वरभेद, जीवजडभेद, जीवजीवभेद, जडजडभेद व जडेश्वरभेद असा पाच प्रकारचा भेद असतो असे मानल्यामुळे हा संप्रदाय भेदवादी आहे.[2]

प्रत्यक्ष, अनुमान व श्रुती (वेद) ही ज्ञानाची तीन प्रमाणे असून या तीनही प्रमाणांनी भेद सिध्द करता येतो. वेद अपौरुषेय आहेत; त्यांना स्वत: प्रामाण्य आहे. जग सत्य आहे ईश्वर हा जगाचे फक्त निमित्तकरण आहे ! फक्त विष्णूच्या उपासनेनेच मोक्ष मिळू शकतो. मोक्षामध्ये ही जीव विष्णूशी एकरुप होत नाही. लक्ष्मी, श्रीवत्स व जग निर्माण करण्याची शक्ती, ही तीन वैभवे जिवाला कधीच मिळत नाहीत, सर्व दु:खाचा नाश होऊन विष्णूच्या सानिध्यात राहणे हाच मोक्ष होय. आदी सिध्दांतावर हा संप्रदाय आधारलेला आहे. संप्रदायामध्ये ईश्वराची उपासना अंकन, नामकरण आणि भजन अशी त्रिविधरुपे मानण्यात आली आहेत. विष्णुच्या रुपाचे स्मरण व्हावे व इस्ट असा मोक्ष प्राप्त व्हावा, म्हणून आपल्या शरीराच्या अवयवांवर विष्णूंच्या आयुधांची चिन्हे वा मुद्रा अंकित करणे हे अंकण होय.[3] हे अंकण गोपीचंदनाच्या गंधाने केले जाते, तसेच तत्पमुद्रेच्या स्वरुपातही केले जाते. मठात गेल्यावर गुरुकडून ही मुद्रा घेतली जाते. उजव्या दंडावर सुदर्शनचक्र आणि डाव्या दंडावर शंख अंकित केला जातो. (मुद्राविधी) सदैव ईश्वराचे नामस्मरण घडावे या हेतूने पुत्रादींची केशव वेगैरे नावे ठेवणे हे नामकरण होय, भजनाचे दहा प्रकार मानण्यात आले असून त्यामध्ये सत्य वाणी वेगैरेचा अंतर्भाव केलेला आहे. (भजन)

संप्रदायाचे अनुयायी शाळिग्रामच्या रुपाने विष्णूची पूजा करतात. गळयात तुळशीमाळा घालतात. कपाळावर गोपीचंदनाच्या दोन उभ्या रेषा, त्यांच्यामध्ये उभी कोळी रेषा आणि तिच्या शिरोभागी वळवीचा बिंदू अशी मुद्रा घेतात. गुरुविषयी अत्यंत आदर असल्यामुळे त्याचे स्मारक म्हणून वृंदावन बांधतात. व त्याची पुजा

करतात. हे लोक मोठ्या प्रमाणात उपवास करतात; परंतु वैष्णव व्रतांखेरीज अन्य व्रते मान्य नसल्यामुळे महाशिवरात्रीला उपवास न करता पुरणपोळीचे जेवण करतात.[4]

कर्नाटकातील उडिपी जवळील पाजक क्षेत्र हे मध्वाचार्यांचे जन्म स्थान आहे. तसेच त्यांनी उडिपीमध्ये श्रीकृष्णाच्या मूर्तीची प्रतिष्ठापनाही केली होती. त्यामुळे उडिपी आणि या गावाचा परिसर हे सांप्रदायिकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे तीर्थक्षेत्र बनले आहे. मध्वाचार्यांनी कृष्ण मंदिरातील पूजा आदी धार्मिक कृत्यांची जबाबदारी आठ शिष्यावर सोपवली होती. आणि त्यांच्यासाठी या भागात आठ मठांची स्थापनाही केली होती.[5] त्या शिष्यांची व मठांची नावे पुढीलप्रमाणे ऋषीकेश तीर्थांचा पालीमार मठ, नृसिंह तीर्थांचा अडमार मठ, जनार्दन तीर्थांचा श्रीकृष्णपूर मठ, उपेंद्र तीर्थांचा प्रतिगे मठ, वामन तीर्थांचा शिरुर मठ, विष्णुतीर्थांचा सोडे मठ, रामतीर्थांचा कणियूर मठ आणि अधोक्षज तीर्थांचा पेजावर मठ हे आठ शिष्य प्रत्येकी दोन वर्षे या पध्दतीने मंदिरात पूजा करीत असत. दोन वर्षांनी होणाऱ्या बदलास पर्याय असे नाव होते. येथील मंदिरात मकरसंक्रातपूर्वी दहा दिवस मोठा उत्सव होत असतो. उडिपी येथे प्रमुख मठांखेरीज राघवेंद्र स्वामीमठ व्यासनारायण मठ, उत्तराद्री मठ, भंडारकेरो मठ आदी मठ आहेत. तसेच उडिपीपासून काही अंतरावर सुब्रम्हण्य मठ, मध्वमठ आदी मठ आहेत. या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने कर्नाटकातच आढळतात.

उपनिषदे, ब्रम्हसुत्रे, गीता असे मध्वाचार्यांचे 37 ग्रंथ आहेत. त्यांच्या ग्रंथावरील जयतीर्थ, व्यासतीर्थ वैगेरेच्या टीका आदी ग्रंथ हे संप्रदायाचे प्रमाणग्रंथ होत.[6] नारायणीय उपनिषादांचे विशेष महत्व मानले जाते. तसेच पंचरात्र ग्रंथही आधारभूत मानले जातात. प्रज्ञनाभतीर्थ नरहरीतीर्थ, माधवतीर्थ व अक्षोभ्यतीर्थ हे मध्वाचार्यांचे प्रसिध्द शिष्य होते. अक्ष्योभ्यतीर्थाचे शिष्य जयतीर्थ हे मध्वाचार्यांच्या ग्रंथाचे सर्वश्रेष्ठ भाष्यकार मानले जातात. जयतीर्थनंतरचे प्रमुख व्यासतीर्थ, व्यासतीर्थाचे शिष्य वादिराजव व नंतर होऊन गेलेले राघवेंद्रतीर्थ, रघुत्तमतीर्थ आणि त्यांचे शिष्य रामाचार्य व बेदेश भिक्षु, वनमालीमिश्र त्रिविक्रमभट. या माधवशिष्याचा पुत्र नारायण पंडित हे संप्रदायात होऊन गेलेले काही प्रमुख ग्रंथकार होत.

संप्रदायात विष्णुच्या खालोखाल वायुचे स्थान मानले जाते-हनुमान-भीम व मध्वाचार्य हे वायुचु तीन अवतार मानले जातात. या श्रध्देवर आधारलेल्या आणि मध्वाचार्यांचे चमत्कार करण्याचे अलौकिक सामर्थ्य दर्शविणाऱ्या अनेक कथा संप्रदायात रुढ आहेत. मोक्ष मिळविण्यासाठी वायूला म्हणजेच वर्तमान युगात मध्वाचार्यांना शरण जा असा उपदेश केला जातो.

महाभारतातील भीमाच्या विविध पराक्रमांपैकी मणिमत राक्षसाला मारण्याची कथा संप्रदायात सर्वात अधिक महत्वाची मानली जाते. मणिमत राक्षस मोहशास्त्रे निर्माण करणाऱ्या शंकराचार्यांच्या रुपाने अवतरला, तर भीम मध्वाचार्यांच्या रुपाने असे सांप्रदायिक मानतात.[7] तुलनेने कमी महत्वाचा असा मणिमत राक्षसाच्या हत्येचा प्रसंग संप्रदायायामध्ये फार महत्वाचा मानला गेला. याचा अर्थ मध्वाचार्य इराणमधील मणी संप्रदायाशी परिचित झालेले असावेत, असा तर्क काही पाश्चात्य विद्वानांनी मांडलेला आहे. त्यांच्यावर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव असल्याचे मतही मांडण्यात आले आहे, परंतु या मतांना निर्णायक पुरावे देण्यात आलेले नाहीत.

मध्ययुगीन भारताच्या धार्मिक व सामाजिक जीवनावर मध्व संप्रदायाचा मोठा प्रभाव पडला होता. शंकराचार्यांच्या मायावादाला विरोध करुन मध्वाचार्यांनी जी वास्तव भूमिका घेतली तिच्यामुळे सर्वसामान्य माणसाचा आशावाद व आत्मविश्वास वाढला आणि पुढे विजयनगरचे साम्राज्य उभे राहण्यास तो प्रेरक ठरला, असे काही अभ्यासकांचे मत आहे. चैतन्याचे गुरु मध्व संप्रदायी असल्यामुळे चैतन्य संप्रदायावरही मध्व संप्रदायाचा प्रभाव पडलेला होता. कर्नाटकातील दासकूट नावाचा हरिदास संप्रदाय मध्वानुयायी होता. आणि त्याने कन्नड भाषेतील भक्ती साहित्यात फार मोलाची भर घातली आहे. (कन्नड साहित्य) मध्वाचार्यांचे शिष्य नरहरीतीर्थ यांच्या साहित्यापासून दासकुटांच्या साहित्याचा प्रारंभ झाला असे मानले जाते.[8] दासकुट संप्रदायाची प्रत्यक्ष स्थापना मात्र प्रज्ञनाभ तीर्थांच्या मुलबागल मठाचे मठाधिपती श्रीपादराज यांनी केली. व्यासराय हे त्यांचे शिष्य होते. पुरंदरदास व कनकदास हे व्यासरायचे विख्यात शिष्य असून त्यांनी रचलेली भक्ति गीते कर्नाटकात अजुनही घरोघरी म्हटली जातात. वदिराज, विजयदास, जगन्नाथदास आदी संत याच परंपरेत होऊन गेले. मध्व संप्रदायाने देवदासींच्या प्रथेला विरोध केला, हे त्यांचे एक महत्वाचे वैशिष्ट्य होय. तसेच त्यांनी यज्ञामध्ये पशुंचा बळी देण्याऐवजी पिष्टपशू अर्पण करण्याचा पुरस्कारही केला आहे. मध्वाचार्य माघ शुध्द नवमीला हिमालयात बद्रिकाश्रमाजवळ बर्फातून चालत चालत कायमचे अदृश्य झाले. म्हणून तो दिवस मध्वनवमी या नावाने “बद्रिकाश्रम प्रवेश” म्हणून साजरा केला जातो.

**संदर्भग्रंथ सुची**

1) विद्यालंकार नन्दकिशोर, (राधाकृष्णन) भातीय दर्शन, राजपाल एण्ड सन्स, दिल्ली 6, 1966, पृ. 125.

2) पूर्वोक्त.
3) वेदालंकार जयदेव, भारतीय दर्शनशास्त्र का इतिहास, चतुर्थ भाग, न्यु भारतीय बुक कॉर्पोरेशन, दिल्ली, प्रथम संस्करण, 2005, पृ. 78.
4) शर्मा मुंशीराम, भक्ति का विकास, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी, 1958, पृ. 80.
5) पूर्वोक्त, पृ. 81.
6) पूर्वोक्त.
7) शर्मा मोहनलाल, (अनु.), (दासगुप्ता सु.), भारतीय दर्शन का इतिहास, भाग 4, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी जयपुर 4, द्वितीय संस्करण, 1989, पृ. 130.
8) शर्मा रामशरण, (संपा.), (के. दामोदरन), भारतीय चिन्तन परम्परा, पीपल्स पब्लिशिंग हाऊस, (प्रा.लि) नई दिल्ली, 55, पृ. 140